जनसंपर्क अधिकारी कार्यालय,
ठाणे शहर पोलीस

दिनांक :– २६/०६/२०२६

ठाण्यामधील नामांकित शाळेचे बांधकाम हे अनिधकृत असल्याबाबत ठाणे महानगर पालीकेमध्ये तक्रार अर्ज करून सदर तक्रार अर्ज मागे घेण्यासाठी शाळेच्या प्रशासकीय अधिकाऱ्याकडे खंडणी मागणाऱ्या आरटीआय कार्यकर्त्यांच्या दुकलीला खंडणीची १५ लाख रूपये रक्कम स्विकारतांना खंडणी विरोधी पथकाकडून अटक

अर्जदार बिरबल गोविंदा बंडगर हे सेंट झेवीयर्स हायस्कूल आणि ज्युनीयर कॉलेज, रायमास्टर कॅम्पस, चितळसर मानपाडा, घोडबंदर रोड, ठाणे पश्चिम येथे प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करतात. त्यांनी खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर कार्यालयात ''इसम नामे राजवीर राजपूत व नारायण शर्मा सेंट झेवीयर्स शाळेचे बांधकाम अनधिकृत असलेबाबत ठाणे महानगरपालीकेत खोटया तक्रारी दाखल करून शाळेवर कारवाई करण्याची धमकी देवून २५ लाख रूपयांची खंडणी मागणी करीत आहेत '' असा विषयांकित असलेला अर्ज केला होता. सदर अर्ज चौकशी दरम्यान अर्जदार बिरबल बंडगर व इसम नामे १) राजवीर राजपूत, २) नारायण शर्मा यांचेमध्ये चर्चा होवून तडजोडी अंती १५ लाख रूपये खंडणी स्विकारण्याचे मान्य केल्याने दिनांक २५/०६/२०२६ रोजी खंडणी विरोधी पथकाडील पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी शासकीय पंचांसमक्ष सापळा कारवाईचे जी/७, श्रीपाल कॉम्पलेक्स, सीटी डेअरी, रवी कम्पाऊंड, पाचपाखाडी, ठाणे पश्चिम येथे आयोजन करून अर्जदार बिरबल बंडगर यांचेकडून १५ लाख रूपयाची खंडणी स्विकारतांना आरोपी इसम नामे १) प्रमोद चंद्रकांत परदेशी उर्फ राजवीर राजपूत, वय ४६ वर्षे, काम ॲडव्हटायझींग होल्डींग तयार करणे, रा. १०२, श्री स्वामी कृपा, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे पश्चिम २) नारायण ओमप्रकाश शर्मा, वय ३८ वर्षे, धंदा नोकरी रा. रूम नं. २०४, माविस टॉवर, ए विंग, श्रीनगर, महाराष्ट्र बॅक जवळ, ठाणे पश्चिम यांना १४:१५ वा रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले

सदर कारवाई चे अनुषंगाने अर्जदार बिरबल गोविंदा बंडगर वय ५० वर्षे, काम नोकरी, रा. राय सर हाऊस, बुध्दविहार जवळ, पातलीपाडा, घोडबंदर रोड, ठाणे पश्चिम, यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नौपाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १८२/२०२६ बिएनएस कलम ३०८(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यात उपरोक्त दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/भुषण कापडणीस हे करीत असून सदर आरोपींची मा. न्यायालयाने दिनांक २९/०६/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे.

याद्वारे ठाणे पोलीस आयुक्तालयातील जनतेला आव्हान करण्यात येते की, सदर आरोपींनी आणखी कोणाकडे खंडणीची मागणी केली असल्यास खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा, कोर्ट नाका, ठाणे येथे समक्ष भेटून माहिती दयावी.

सदरची कारवाई मा. श्री. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), ठाणे शहर; मा. श्री अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), ठाणे शहर; मा. श्री. विनय घोरपडे, सहायक पोलीस आयुक्त (शोध २), गुन्हे शाखा, ठाणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वपोनि/शैलेश साळवी, सपोनि/भुषण कापडणीस, पोउनि/सुभाष तावडे, पोहवा/४१८४ राठोड, पोहवा/१८३४ शैलेश शिंदे, पोहवा/१०१५ राजाराम पाटील, पोना/७०७९ सुमित मधाळे, पोशि/१९८४ अरविंद शेजवळ, मपोशि/८१०१ मयुरी भोसले, चापोहवा/७३१२ हिवरे यांनी केली आहे.